जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 DEC 2023
पुढारी



कोल्हापूर : ॲड. रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ ३५ लाख रुपयांच्या देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना हेमकिरण पणदूरकर, ॲड. राम पणदूरकर. सोबत वरदराज बापट, ॲड. अमोल रणसिंग, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, एस. के. पवार.

# रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ विद्यापीठास ३५ लाखांची देणगी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे निवृत्त भूगोल अधिविभाग प्रमुख व ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ डॉ. (ॲड.) राम पणदूरकर व त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी पेन्शन बचतीतून साठविलेली ३५ लाख रुपयांची जमापुंजी डॉ. रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केली. या देणगीमधून शिवाजी विद्यापीठातील 'कमवा व शिका' विद्यार्थिनी वसतिगृह परिसरात विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका बांधण्यात येणार आहे. नवीन वर्षात ही अभ्यासिका साकार होईल.

ॲड. रूपाली पणदूरकर यांनी सर्व शिक्षण विद्यापीठातून पूर्ण केले. ३० व्या वर्षी त्यांनी 'महाराष्ट्रातील बालगुन्हेगारीचा सामाजिक व कायदेविषयक अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध सादर करून कायदे विषयात पीएच.डी. मिळविली. सर्वोच्च न्यायालयाच्या 'न्यायदीप' या संशोधन पत्रिकेत त्यांचे अभ्यासपूर्ण संशोधन लेख प्रसिद्ध झाले होते. त्यांनी २००१ पासून १४ वर्षे कोल्हापूर दिवाणी न्यायालयात वकिली केली. कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेऊन देणगीचा धनादेश दिला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, वरदराज बापट, प्रा. एस. के. पवार, ॲड. अमोल रणसिंग उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 DEC 2023
सकाळ

# आत्मनिर्भरतेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी संशोधन आवश्यक

## प्र-कुलगुरू प्रमोद पाटील : न्यू कॉलेजमध्ये परिषद

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २४ : 'विकसित आणि आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी नॅनो मटेरियल क्षेत्रातील संशोधन आवश्यक आहे. महाविद्यालयांनी अध्यापनासह संशोधनाला चालना देऊन विद्यार्थ्यांच्या सृजनशक्तीचा विकास करावा', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले.

न्यू कॉलेजमध्ये रसायनशास्त्र विभाग आणि श्री. यशवंतराव पाटील सायन्स कॉलेज सोळांकूरतर्फे आयोजित 'नॅनोमटेरियल फॉर एनर्जी अँड इनव्हायरमेंट' या विषयावरील सहाव्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे अध्यक्ष के. जी. पाटील होते. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. ए. डी. चौगुले यांनी परिषदेच्या आयोजनाचा उद्देश सांगितला. प्रमुख उपस्थितांच्या हस्ते 'सोव्हेनिअर' संशोधन पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्रा. डी. जी. किल्लेदार, विनय पाटील, सविता पाटील, सी. आर. गोडसे, वाय. एल. खाडे, आर. वाय. पाटील, ए. वाय. पाटील, जी. जी. चौगुले, फिलिपाइन्सचे प्रा. फ्लोरेन्शो बॅलेस्टेरोस उपस्थित होते. डॉ. आर. बी. पाटील यांनी आभार मानले.

25 DEC 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तोतया इतिहासकारांना रोखण्याची गरज

## डॉ. अशोक चौसाळकर : शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय परिषदेचा समारोप

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २४ : 'खोटा इतिहास पसरविण्यासाठी समाजमाध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो आहे. अनेक तोतया इतिहासकार आपल्या स्वार्थासाठी इतिहासाचा वापर करून घेत आहेत. त्यांना रोखण्याची गरज आहे', असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.

राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्त्व आणि वस्तुसंग्रहालय संचालनालय, शिवाजी विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अभ्यास केंद्रातर्फे शिवराज्याभिषेक दिन व स्वराज्य स्थापना दिन यांच्या ३५० व्या वर्धापन वर्षानिमित्त 'मराठा इतिहास संशोधनाचा कक्षाविस्तार' या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिषदेचा समारोप शनिवारी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात झाला. त्यावेळी ते बोलत होते. डॉ. चौसाळकर म्हणाले, 'इतिहासाच्या अभ्यासक व संशोधकांनी इतिहासाची वस्तुनिष्ठ व परखड मांडणी करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत इतिहास ही ज्ञानशाखा धोक्याच्या विळख्यात सापडली आहे. अस्मितादर्शी राजकारणासाठी इतिहासाचा गैरवापर करण्यात येत आहे. यापासून अभ्यासक, संशोधकांसह समाजानेही सावध व सजग असायला हवे.'

या कार्यक्रमास डॉ. सी. आर. दास, चंद्रकांत अभंग, जिगर मोहम्मद, इश्रत आलम, वर्षा शिरगांवकर उपस्थित होते. परिषद यशस्वी होण्यासाठी समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप, कोल्हापूर वस्तुसंग्रहालयाचे सहाय्यक संवर्धक उदय सुर्वे, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी परिश्रम घेतले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शनिवारी मराठा इतिहास संशोधन परिषदेच्या समारोपावेळी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून डॉ. सी. आर. दास, चंद्रकांत अभंग, अवनिश पाटील, जिगर मोहम्मद, इश्रत आलम, वर्षा शिरगांवकर, नीलांबरी जगताप उपस्थित होते.**

### मराठाकालीन कागदपत्रांवर नव्याने प्रकाश

■ या तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेसाठी देशभरातून विविध विद्यापीठांतील अनेक तज्ज्ञ, अभ्यासक उपस्थित राहिले. त्यांनी मराठा इतिहासाच्या अनुषंगाने शोधनिबंध सादर केले. मराठा इतिहासाची साधने, इतिहास लेखन, मराठा इतिहासातील आर्थिक पैलू, सामाजिक- सांस्कृतिक इतिहास, पुरातत्त्व, कला आणि स्थापत्य, मराठा युरोपियनांचे आपापसातील संबंध, लष्करी इतिहास अशा विविध विषयांवरील दर्जेदार शोधनिबंधांचा त्यात समावेश होता. मराठाकालीन कागदपत्रांवर नव्याने प्रकाश टाकण्यात आला.